# सौंदर्योपासक विश्वकवी

**डॉ. मधुकर वि.नंदनवार**
**भिवापूर महाविद्यालय**
**भिवापूर**

**सारांश**

**र**वींद्रनाथ टागोरांनी सौंदर्य आणि काव्य याचे मनोहारी चित्र रेखटताना भारताविषयी असलेल्या मागास कल्पना आपल्या साहित्याच्या प्रकाशाने ऊजळवून टाकल्या. आपल्या बहुमूल्य वाणितील शब्द न् शब्द विश्वशांती, प्रेम आणि उदान्त श्रध्दा यासाठी खर्ची घातला. एक ऐश्वर्यसंपन्न महाकाव्य त्यांच्या शब्दातून जल्माला आले. ज्यांकरिता गुरुदेव या शब्दाचा उच्चार केला की, आपल्या नजरेसमोर एकच मूर्तीमंत व्यक्ती उभी राहते आणि ती म्हणजेच गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांची! विश्ववंद्य गुरुदेव रवींद्रनाथांना स्वातंन्यपूर्व काळात साहित्याचा नोबल पुरस्कार १९१३ साली मिळाला. रवींद्रनाथ हे भारतातील व आशियातील प्रथम नोबल विजेते होते. स्वातंन्यानंतर आज अनेक दशके त्यांचे शब्द समस्त भारतीय अत्यादराने उठून उभे राहून म्हणतात. त्यांचे शब्द आपले राष्ट्रगीत बनले आहे. भारताचे राष्ट्रगीत 'जनगणमन'चे कवी, रवींद्रनाथ टागोर साहित्यप्रेमी रसिकांचे कंठमणी बनलेले आहेत. रवींद्रनाथ टागोर विलक्षण प्रतिभेचा कवी, त्यांची विविध कलागामिनी अभिव्यक्ती भारतीय मनाला अत्यानंदाचीच वाटते. ललीतकलांच्या अनेक विद्यांमध्ये त्यांनी मूलभूत ठरेल, अशा प्रकारच्या कलाकृती निर्माण केल्या आहेत. सौंदर्याचा उपासक असलेला महाकवी, सृष्टीप्रेमी लेखनप्रभू या भारताच्या भूमीवर जन्माला येणे हे आम्हा भारतीयांचे अहोभाग्यच म्हणावे लागेल. विश्वशांती, प्रेम उदात्त श्रध्देची जोपासना आपल्या शब्दांतून मांडणारा व त्या मूल्यांसाठी जगणारा हा या देशातील एक श्रेष्ठ व महान असा नोबल पारितोषिक विजेता लेखक होय.

**प्रस्तावना:**

रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव या टोपन नावाने संबोधले जाते. ते विद्वान लेखक, थोर साहित्यिक, प्रतिभावान कवी, कादंबरीकार, नाटककार, संगीतकार व प्रसिध्द चित्रकार होते. साहित्याच्या क्षेत्रात नोबल या उच्च पुरस्काराचा सन्मान प्राप्त करणारे, बंगाली साहित्यावर विशेष

प्रभूत्व ठेवणारे रवींद्रनाथ टागोर यांच्या 'गीतांजली' व 'जन—गण—मन' या रचनेने ते प्रसिध्दीसाठी अजरामर आहेत. शांतीनिकेतनची उभारणी करणारे, सृजन साहित्यिक म्हणून ओळख असणारे आणि भारतीय तसेच बांगलादेशी राष्ट्रगीताचे रचियेते म्हणून संपूर्ण भारतात प्रसिध्द व नावलौकीक प्राप्त आहेत. या प्रतिभावंत लेखकाचे घराणे म्हणजे कलागुणांनी लखलखणारी रत्नांची खाणच होती. धनाढ्य घरातील सुसंस्कृत वातावरणात वाढलेली ठाकूर घरातील मुले सरस्वतीचा वरदहस्त मिळवूनच जन्माला आली होती. ब्राम्हो समाजासारख्या सुधारक विचारांच्या देवेंद्रनाथ ठाकूरांचा रवींद्रनाथ सर्वात धाकटा मुलगा. ब्राम्हो समाजाचे नेतृत्व करणाऱ्या देवेंद्रनाथाचे सारे घराणेच आधुनिकता आणि प्राचीनता यातील सुरेख दुवा बनले होते. चित्रकला,संगीत,साहित्य,नाटक, शिक्षण व राजकीय अशा क्षेत्रात चाकोरी मोडून नवं चैतन्यशील अस्सल भारतीय आविष्कार रवीद्रनाथांनी सादर केला. त्यांच्या प्रत्येक कृतीतून देशप्रेम व्यक्त होत होते, पण अवघडलेलं, कक्ष पध्दतीने झिरपणारे देशप्रेम नव्हते तर सरळ मनाला हात घालणारे, सौंदर्याला साद घालणाऱ्या शब्दांनी, सुरांनी त्यांनी साऱ्या भारतीयांना जागे केले. आपल्या दैदीप्यमान परंपरा, भाषा, ज्ञानाकडे अभिमानाने पाहायला त्यांनी शिकविले. रविद्रनाथांच्या राजबिंड्या व्यक्तीमत्वाने साऱ्यांना मोहवून टाकले. त्यातून त्यांच्या शब्दाशब्दांतून सुसंस्कृत, संवेदनशील, सहृदयी, सक्रीय तरुण हृदयाला थेट हाक होती हे निश्चितच मान्य करावे लागते.

**जन्म व कार्ये:**

रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म कोलकत्ता येथे ७ मे १८६१ साली झाला. एका सुदर, ऐश्वर्यसंपन्न उपनिषदकालीन तारकामंडित जगाकडे जाण्यासाठी वेळ पडली तर 'अकेला चलो रे'ची हाक या देशात स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या महात्म्यानी दिली ते रवींद्रनाथ होत. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात व २०व्या शतकाच्या प्रारंभी यांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमुलाग्र बदल घडून आल्याचे दिसते.

**शिक्षण विषयक भूमिका:**

रवींद्रनाथ टागोरांना वयाच्या १७व्या वर्षी इंग्लडला पाठविण्यात आले. त्याआधी त्यांचे बहुतेक शिक्षण घरीच झाले. १६व्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपणनावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. इग्लडला त्यांचे अभ्यासात मन रमत नव्हते. निसर्गाची शाळा सोडून भिंतीकडे तोंड करुन पाहत शिकविलेले ग्रहण करणे त्यांना नकोसे वाटे. शाळा म्हणजे कोंडवाडे आहेत. झाडावर

बसायच्या ऐवजी बाकावर बसून अभ्यास करणे त्यांना निरस वाटत असे. आनंद हा मुलांचा स्थायीभाव नष्ट करणाऱ्या शाळेच्या इमारती त्यांना पसंत नव्हत्या म्हणूनच झाडांच्या सावलीत, निसर्ग पाहत, अनुभवत अभ्यास शिकविणारी शाळा त्यांनी उभारली. त्यांनी शांतिनिकेतनची उभारणी १९०१ साली केली. या आश्रमात त्यांनी एका प्रार्थना गृहाची, प्रयोगशील शाळेची, बागबगीचा व ग्रंथालयाची स्थापना केली. तेव्हा त्यांचे पहिले विद्यार्थी त्यांची मुले रवींद्र व शमिंद्र हे होते. इंग्रजी राजकर्त्यांच्या वागणूकीबध्दल त्यांना राग होता. कारण इंग्रजांनी भारतीयांच्या मनातील स्वभाषा, संस्कृती याबध्द्लच्या अभिमानाला द्रोह ठरविले होते. परंतु निसर्ग, भाषा, संगीत यावर सर्वांना प्रेम करायला शिकविले हे सत्य मानणारे होते.

**तपोवन संकल्पना:**

रवींद्रनाथांना स्वत:ला तपोवन ही कल्पना अतिशय आवडत होती. त्यांना स्वत:ला जमीनदारीच्या कामानिमित्त पद्मा नदीच्या किनारी खेड्यात राहावे लागले.तेथील लोकांची गरीबी, रोगराई,भीती,उदासीनता यांनी भरलेलया जीवनाची त्यांना ओळख झाली. निसर्गातील संथ सृजनशीलता, समृध्द वैविध्य यांची रवींद्रांना फार ओढ होती. त्यामुळे हे काम त्यांच्या पथ्यावर पडले होते. राजेशाही पध्दतीने कलकत्याच्या वाड्यात राहणारे टागोर आणि कंपनीच्या मालकाचे जमीनदाराचे हे शेंडेफळ जिथे जाई त्याच्या सहवासात येणारे त्याच्या व्यक्तित्वाने भारले जात. बामन ठाकूर म्हणजे गाववाल्यांचे ब्राम्हण देवताच होते. परंतु गावाने पूर्वी त्यांना वाळीत टाकले होते. तेव्हा त्यांनी इंग्रजांशी व्यापार करुन रवींद्रनाथांच्या आजोबांनी नशीब काढले होते. प्रिन्स व्दारकानाथ म्हणून ओळखले जाणारे हे गृहस्थ व्हिक्टोरिया राणीच्या म्हणे पंक्तीला बसत असे. या सर्व राजवैभवात राहणाऱ्या ठाकूर घराण्यातील लोकांचा दृष्टिकोन सुधारकी होता परंतु आपण भारतीय असल्याचा आत्यंतिक अभिमान होता.त्यामुळे त्यांच्या घरातील लोकांनी जी ललीत कलांमध्ये प्रतिभा दाखवली त्यात भारतीयत्व ठासून भरलेले आहे हे ठामपणे सांगता येईल.

**रवींद्रनाथाची जाज्वल्य प्रतिभाशक्ती:**

कवी रवींद्रनाथावर बंगालीतील प्राचीन कवींच्या व लेखकांच्या लिखानाचा खोलवर परिणाम झाला होता. १८६१ साली महर्षी देवेंद्रनाथांना झालेला हा १३ वा पुत्र होता.त्यावेळी बंगालमधील नवतेच्या लाटेच्या काळात रविंद्र अवतरला होता. मुळातच स्वभावाने हळवा,स्नेहार्द्र नेत्राचा रवींद्र सर्वांचा लाडका होता. लहानपणापासूनच त्याचे भाषेवर प्रेम होत. लहानपणात भवतारिणी या

१०वर्षाच्या मुलीशी विवाह झाल्यावर आपल्या अशिक्षित पत्नीला इंग्रजी भाषा शिकवून घेतली. त्यांच्या कादंबरी या भावजयीवर फार जीव होता. रवींद्रनाथांनी आपल्या चार कादंबऱ्या तिला अर्पण केल्या आहेत असे दिसते.

रवींद्रनाथांच्या जाज्वल्य प्रतिभेचा मागोवा घेता असे दिसते की, त्यांच्या प्रतिभेने चित्रकारी पासून संगीतापर्यंत सर्व क्षेत्रात त्यांनी नवे मापदंड निर्माण केले आहेत. त्यांचा काळ म्हणजेच बंगालातील व देशातील परिवर्तनाचा काळ होता असे दिसते. त्यावेळी सामाजिक, राजकीय, धार्मिक अशा सर्वच क्षेत्रात भारतातील दिग्गज व्यक्तिमत्व आपला ठसा उमटवित होते. राजा राममोहन रॉय, स्वामी विवेकानंद, सुभाषचंद्र बोस, बंकिमचंद्र चॅटर्जी अशी एकाहून एक नवरत्ने १९व २०व्या शतकात देशाला दिव्य प्रकाशाने दिपवून टाकीत होती. बंगालची ही फार मोठी देणगी देशाला या रत्नांच्यामुळे मिळाली होती. त्या काळाचा वारसा रवींद्रनाथांच्या प्रत्येक कृतीतून स्पष्टपणे प्रकट होत होता. रवींद्रनाथांचा सर्वात प्रभावी व प्रिय तसेच आवडीचा विषय असेल तो काव्य होय असेच म्हणावे लागेल. त्यांच्या गीतांजलीमध्ये तत्वज्ञान व कोमल भावना यांचे हृदयगम्य दर्शन आपल्याला घडते. भारतीय संस्कृतीचा अर्क त्यांच्या लिखानात होता तो विदेशी लोकांना मिळाला. त्याअगोदर ब्रिटीश व युरोपीयन अभिजनांच्या मनात हिंदुस्थान म्हणजे एक गुढ मागासलेला देश, अस्वच्छ माणसे, बळी व सती परंपरेचा असंस्कृत देश असे चित्र होते. त्यावेळी १९१२साली रवींद्रनाथांनी कवी थीटस्च्या उच्चभ्रू मित्रासमोर आपल्या ‘गीतांजली’ या महाकाव्याचे इंग्रजी भाषांतर सादर केले आणि सारे प्रेक्षक व तज्ञ भारावून गेले. रवींद्रनाथांनी केलेले भा ांतर त्यावेळपर्यंत कुणीही करु शकले नव्हते. उदात्त, सुंदर वेगळया वातावरणातले आपण कधी वाचले, ऐकले नाही अशी अनेकांची प्रतिक्रीया होती. थीटस्ने एका कार्यक्रमात एझरा पाऊंड,हरमन हेससारख्या प्रतिभावंतानी आपण आजवर असे काही दिव्य ऐकले नसल्याचा निर्वाळा त्यावेळी दिला. यावरुन रवींद्रनाथ टागोरांच्या अलौकिक व जाज्वल्य प्रतिभेची प्रचिती कळून येते.

**पाश्चात्यावर पगडा:**

युरोपीयन देशातील कवी हे राग, संताप या भावनेतून लेखन करतात, परंतु असा आगळा वेगळा कवी की, जो असीम तृप्ती व निसर्गातील शांतवृत्ती या प्रेरणेतून आपले काव्य लिहीतो आहे हे बघुन त्यांच्या कवितांचे बाड कित्येक दिवस थीटस् ने आपल्याजवळ बाळगले इतकेच नव्हे तर आपल्या ट्रेन व बसच्या प्रवासात तो सहप्रवाशांना रवींद्रनाथांच्या कविता वाचून दाखवत असे इतका जिव्हाळा त्यांच्या काव्याचा होता. त्यांच्या कवितेतील निसर्गचित्र व मानवाशी असलेले त्यांचे

नाते यांचे बहारदार वर्णन आपल्या मैफलीत रविंद्रनाथांना आपण रसिक अभिजनांसमोर आणले याचा अत्यंत अभिमान होता. रवींद्रनाथांनी मैफीलीत कवितेचे कडवे वाचल्यानंतर अनेकांनी त्यांच्यावर स्तुतीसूमने उधळली यावरुन त्यांचे काव्य किती सौंदर्याने भरलेले असेल याची प्रचिती येते. या स्तुतीच्या वर्षावाचे शिखर त्यांना साहित्यासाठी नोबल पारितोषिक मिळाल्यावर गाठले गेले हे सत्य आहे. १९१३ साली 'गीतांजली'च्या खास उल्लेखाने हा गौरव त्यांना दिला गेल्याचे जाहीर झाले. आशियातील प्रथमत: एखादया साहित्यकाराला नोबल पुरस्कार मिळण्याची ही पहिलीच वेळ होती. अनेक पाश्चात्य समिक्षक व साहित्यिकांना ही घटना आवडली नाही असे दिसते. परंतु रवींद्रनाथांच्या काव्यातील सौंदर्य वाखाणून मे. सिंक्लअरने रवींद्रनाथांना लिहीले होते की,''तुमचं लेखन हे सौंदर्य व काव्य यांच्या पूर्णतेने व्यापलं आहे. एवढेच नव्हे तर यात एक दिव्य आभास त्यातून सतत होत असतो. इंग्लिश भा तील तुमचे हे काव्य त्या भाषेतही अनोखं, अव्दितीय ठराव असंच आहे.'' यावरुन त्यांची विद्वता साऱ्यांना दिपवून टाकणारी अशीच होती. हे कबूल करावे लागते. तथाकथीत एझरा पाऊंड तर रवींद्रनाथांच्या काव्यातील सौंदर्य व प्रासादिकतेने इतके भारावून गेले होते की, ''आपण कित्येक दिवस त्या धुंदीतून बाहेर पडलो नाही'' असे म्हणतात.

**निसर्ग कवीची विद्वत्ता:**

पश्चिमात्य जगतातील माणसाला निसर्गावर विजय मिळविण्याचा ध्यास लागलेला असतो. त्यातच त्याला नाट्य दिसते, परंतु ह्या साधेपणाच्या साधकाला निसर्गाच्या विभ्रमामध्ये आणि दैवाच्या खेळात माणसाचे भवितव्य दिसते. असे साऱ्या बाजूनी कौतुक अंगावर घेत असताना एका हिंदूला, गोऱ्या नसलेल्या माणसाला नोबल पुरसकार मिळणे याचा राग युरोपीयन समिक्षकांना, अमेरिकन रसिकांना येत होता. ज्याचे नाव विचित्र आहे, अशा माणसाला नोबेल? ज्या हिंदू कवीचे नावदेखील अनेकांना उच्चारता येत नाही, ज्यांच्या साहित्याशी अमेरिकनांचा परिचय नाही त्याला फारच थोडया लोकांची मान्यता नि लोकप्रियता मिळण्याची शक्यता आहे.' असे वाटू लागते. परंतु ह्याच निसर्गकवीची, ऋषीतुल्य लेखकाची लेखणी पाश्चात्य जगाने त्यानंतर लगेच डोक्यावर घेतली हे सत्य विसरता येत नाही.

**भरतीय कोहिनूर:**

रवींद्रनाथ टागोर च्या रूपाने थीटस्ने भारतीय कोहिनूर जगापूढे ठेवला. त्याचवेळी अगदी तरुण वयात दुसऱ्या एका महान लेखकाने रवींद्रला पारखले हाते. बकिंमचंद्र चॅटर्जीच्या

अध्यक्षतेखाली एक साहित्यिक कार्यक्रम होता. बकिंमचंद्रांच्या गळयात हार घातला गेला तेव्हा त्यांनी तो हार काढून तेथे उपस्थित असलेल्या रवींद्रनाथांच्या गळयात घालून म्हटले,''ह्या सन्मानाचा अधिकारी हाच साहित्यिक आहे, सध्या संगीत वाचलं की पटेल.'' रवींद्रनाथांच्या लेखनीचे सामर्थ्य सर जगदीशचंद्रांनीही पुरेपूर ओळखले होते. दोघेही आपल्या क्षेत्रात नवे पायंडे पाडत असताना टागोर म्हणाले होते,''माझे आयुष्य सकाळच्या धुक्यासारखं अस्पष्ट असता माझी भेट जगदीशशी झाली. तोवर त्यानेही फार मोठी उंची गाठलेली नव्हती. उगवत्या सूर्याप्रमाणे तोदेखील पर्वत उंचीवरुन चालत होता. आम्हा दोघांची मैत्री एखादया जुन्या चित्राप्रमाणे अनेक ठिकाणं, रंग व वातावरण यात घडत होती. मी एकटा होतो. माझं जीवन कुटुंबानं आखून दिलेल्या चौकटीनुसार वाटचाल करीत होतं. अशावेळी जगदीशशी मैत्री जुळली. त्यानं मला माझ्या कोपऱ्यातून बाहेर काढलं जसं थंडीतल्या सकाळचं उबदार ऊन मला अंथरुणातून बाहेर काढी तसं. '' भारतीय कोहिनूराचे मैत्रीसंबंधीचे वाक्य एका महान तत्ववेत्याचे असून आपल्या हृदयाला जाऊन भिडतात.

**निसर्ग व मित्रप्रेम:**

रवींद्रनाथ व जगदीशचंद्र यांची घनिष्ठ मैत्री होती. वाळूत नांगर टाकलेल्या बोटीत बसून ते 'भारती'चे संपादन व 'साधना'ची तयारी करीत होते. याच शांत, निसर्गरम्य जागी राहताना त्यांनी अनेक कथा लिहल्या. दोघांच्या भेटीत जगदीशचंद्र रवींद्रनाथाला शांतीनिकेतनचे रुपांतर विश्वभारतीत व्हावे, ही संस्था देशाला ललामभूत अशी संस्था बनावी यासाठी आग्रह करीत होते त्यासाठी ते चिंतेत असल्याचे दिसते. शांतीनिकेतनला येऊन झाडे लावण्यापासूनची कामे करण्यापर्यंत त्यांनी रस घेतला होता. तीच कथा बोस इन्स्टिटयुटचे रूप विराट व्हावे यासाठी रवींद्रनाथ प्रयत्नशिल होते. आपल्या मित्रातील तेज त्यांनी ओळखले होते. त्यांच्या मित्रप्रेमाच्या, तत्वप्रेमाच्या अनेक कथा प्रसिध्द असल्याचे दिसते. त्यांच्या काळातील दोन दिग्गज नेत्यांबध्दल रवींद्रनाथांच्या मनात नितांत प्रेम व आदर असल्याचे दिसते. महात्मा गांधी व सुभाषचंद्र बोस दोघेही त्यांना प्रिय होते.पण कुण्या एकाच्या विचाराच्या सर्वस्वी आहारी ते कधी गेले नाही. सुभाषचंद्र बोसांना त्यांनी देशनायक म्हणून गौरविले होते. पंडित जवाहरलाल नेहरुंशी त्यांचे जवळचे संबंध होते. परंतु त्यांनी कधी राजकारणात प्रवेश केला नाही पण राजकीय विचार स्पष्टपणे मांडले. गांधीजींच्या विचाराशी ते अनेक बाबींमध्ये सहमत होते तर काही बाबींमध्ये त्यांचे मतभेद होते. विदेशी वस्तू जाळण्यात टागोरांना अर्थ वाटत नव्हता. कारण त्यांना आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी ही

देवाणघेवाण चालू राहावी असे वाटत होते. हा त्यांचा दूरदृष्टीकोन महत्वाचा असल्याचे प्रत्ययास येते. ग्रामस्वराज्य,स्वभाषा प्रेम, साधी राहणी याबाबत दोघांचेही एकमत होते.

**राष्ट्रभक्ती व साहित्य:**

रवींद्रनाथ टागोरांना राष्ट्रप्रेम व राष्ट्रभक्ती लहानपणापासूनच झालेली होती. आपल्या वडील भावंडासह घरातील अनेक सांस्कृतिक कार्यक्रमात व स्वदेशी मेळाव्यात ते काम करायचे. त्यातच त्यांनी आपल्या रचनांना आपणच चाली द्यायला सुरुवात केली. त्याचे पर्यवसान 'रवींद्र संगीत' नावाची स्वतंत्र व स्वयंभू संगीत शाखा बंगालच्या संगीतविश्वात दाखल झालेली आहे. त्यांचे 'चल रे चल रे सबल भारत संतान' हे ज्योतिरिंदनाथांचे गीत व सत्येंद्रनाथांचे 'मिले सब भारत संतान' किंवा सरलादेवीचे 'अतीत गौरव बाहिनी ममवानी'सारख्या रचना लोकांसमोर येऊ लागल्या. महात्मा गांधीजींना प्रिय असलेले 'एकला चलो' हे रवींद्रनाथाचे सुप्रसिध्द् गीत याच काळातील होय.

**नाटककार:**

रवींद्रनाथांनी अत्यंत दर्जेदार व सुरेख नाटके लिहिली. प्रसंगी नाटकात कामंही केले. 'बादूल' हे बंगालमधील भक्तीगीत गाणाऱ्या जमातीवरील नाटकात त्या जमातीच्या लोकांची वृत्ती, गायनशैली, यांचा ठसा रवींद्रच्या जीवनावर खोलवर होता. म्हणूनच खेडेगावातील संथ व शांत जीवन तेथील दैव व निसर्ग यांनी दिलेले आयुष्य निमूठपणे कंठणारे गावकरी, त्यांच्यातील सद्गुण, कलागुणांनी रवींद्रनाथ प्रभावीत होऊन साध्याभोळया,सीध्यासाध्या जीवनातील नियतीचे खेळ, आयुष्यातील सुखदु:खाचे रंग, लहानशा घटनेतूनही चुटपूट लावणारं नाट्य निर्माण करण्यात रवींद्रनाथासारखा प्रतिभासंपन्न सापडणे कठीण आहे. 'वाल्मिकी प्रतिभा' हा एक उत्तम संगीताचा नमूना म्हटला जातो. हे एक गीत नाट्य असल्याचे ते सांगतात. त्याच्या 'रथयात्रा' नाटकात चातुर्वर्ण्यात अडकलेल्यांचे चित्रण महत्वाचे आहे. 'डाकघर' नाटकात माणसाच्या नियतीचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या प्रतिभेतून निसर्गातील सौम्य रुपापासून तर रौद्र रूपापर्यंत, समाजातील सर्व आविष्कार, सुंदरता, कुरुपता सारेकाही त्यांनी 'माणूस' घडविण्यासाठी वापरले आहेत हे सत्य लपविता येत नाही. त्यांच्या अनेक नृत्यनाटीका व नाट्यछटेतून एक सौंदर्यदर्शी कवीच वावरताना दिसतो.

कथेच्या व कादंबरीच्या प्रांतातही रवींद्रनाथांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या कथा व कादंबऱ्या वाचकांना प्रेमात पाडल्याशिवाय राहत नाहित. गोरा कादंबरी असो की काबुलीसारखी कथा असो किंवा पोष्टमास्तर सारखी कथा यातून वाचक अस्वस्थ होतो. इतक्या ताकदीचे कथालेखन करणारा क्वचितच सापडेल. याविषयी गोल्डन बुक ऑफ टागोरमध्ये जर्मन तत्ववेतता काउंट हरमन म्हणतात,‘‘अनेक शतके रवींद्रनाथ टागोरांसारखी कोणीही विभूती जगाच्या पाठीवर झालेली नाही. ते एका राष्ट्राचे निर्माते आहेत...इतर कोणत्याही विद्यमान व्यक्तीबध्द्ल नाही इतका मला रवींद्रनाथांबद्द आदर वाटतो, कारण माझ्या परिचयातील ती सर्वात विश्वव्यापी, सर्वकष आणि परिपूर्ण अशी मानवी व्यक्ती आहे.’’ ही रवींद्रनाथांच्या श्रेष्ठ, उदात्त व बहुमोल तात्वीक विचारांची फलश्रूती होय. अखेरच्या काळात रविद्रनाथांनी विज्ञानात विशेष रस घेतल्याचे दिसते. त्यांच्या विश्वपरिचय या निबंधसंग्रहाची निर्मिती यावेळी झाली. जीवशास्त्र, भौतिकशास्त्र व खगोलशास्त्राचा त्यांनी केलेल्या अभ्यासाचा प्रभाव त्यांच्या कवितेतून जाणवतो. त्या निसर्गवादाची प्रचिती वैज्ञानिक नियमांप्रती असलेल्या आदराने अधोरेखित करण्यासारखी आहे.

**समारोप:**

विश्वकवी रवींद्रनाथ टागोरांचे वांङ्.मय भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी सतत ताजे व अजरामर राहणारे आहे. आजचया काळात पर्यावरण संवर्धनासाठी ‘झाडे लावा, झाडे जगवा’ अशी हाक दिली जाते. ज्या काळात अशी स्थिती नव्हती त्या काळात ‘वृक्ष जगवा, जंगल वाचवा’ असा उपदेश करणारे व त्या काळातही वृक्ष मित्र मानून सतत त्यांच्याच सहवासात जीवनज्ञान देणाऱ्या गृरुदेवांची मूर्ती सर्व रसिकांच्या मनात ठसलेली आहे. गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी जीवनाचा, त्यातील दृष्टीकोनाचा सर्वांगाने विचार केला होता. म्हणूनच गुरुदेवांनी शांतीनिकेतनसारखी निसर्गसान्निध्यातली शाळा काढली, विश्वभारती विस्तारली व श्रीनिकेतनसारखे ग्रामोध्दार केंद्र स्थापन केले. सतत अन्यायाविरुध्द लढा दिला. त्यांच्या आंतरराष्ट्रीय कीर्तीमुळे त्यांचा जगातील अनेक क्षेत्रातील लोकांशी संपर्क आला. शेवटच्या काळात त्यांनी लिहिलेल्या काव्यरचना रवींद्रनाथांच्या काव्यरचनेतील सर्वश्रेष्ठ व महत्वाच्या आहेत. त्यांचे मृत्युविषयक चिंतन या काव्य रचनांतून प्रकर्षाने प्रकट होतांना दिसते. भारतातील खऱ्या अर्थाने विश्वकवी ठरलेला हा महान प्रतिभावंत ७ ऑगष्ट १९४१ रोजी देवाला प्रिय झाला. अशा ज्ञानयोगी महर्षीची इतक्या कमी शब्दात दखल घेणे अशक्य आहे. कारण त्यातून त्याच्या चित्रीकारीला जागा राहत नाही, बालकथांना, अभिनयाला व संगीताला न्याय देता येत नाही त्यासाठी या महान सौंदर्यपासक

विश्वकवीचे स्मरण करता येते. गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांच्या स्मृतीला त्रिवार वंदन करुन त्यांच्या कार्याला व साहित्य क्षेत्रातील महत्वपूर्ण योगदानाला शतशः प्रणाम.

**संदर्भ ग्रंथ—**


- रवींद्रनाथ टागोरः एक संपन्न व्यक्तिमत्व, पद्मिनी बिनीवाले.मेहता पब्लिसिंग हाऊस नवी दिल्ली.
- गीतांजलीः रवींद्रनाथ टागोर, मेहता पब्लिसिंग हाऊस नवी दिल्ली
- रवींद्रनाथ टागोर (चरित्र व्यक्तिचित्रण) उज्ज्वला दीक्षित. शिव पब्लिकेशन मुंबई.
- रवींद्र कल्पना, रवींद्रनाथ टागोर— अनुवाद डॉ. राम म्हैसाळकर, विजय प्रकाशन नागपूर
- रवींद्रनाथ शुभ बुध्दीचे उपासक, आशा साठे. मेहता पब्लिसिंग हाऊस नवी दिल्ली.
- रवींद्रनाथ टागोर:स्वदेशी समाज आणि साधना,मराठी अनुवाद—साने गुरुजी. रिया पब्लिकेशन मुंबई.